बौद्ध धर्माचा ऱ्हास व पिछेहाट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

विनियम प्रकाशन
मुंबई

प्रकाशकीय

बौद्ध धर्माचा ऱ्हास व पिछेहाट हे एक अनमोल पुस्तक आहे. बौद्ध धर्माचा ऱ्हास कसा झाला व त्या ऱ्हासास कोण कारणीभूत आहे हे या पुस्तकात दिले आहे. बौद्ध धर्माच्या क्रांतीविरूद्ध ब्राम्हणशाहीनी प्रतिक्रांती केली. ज्या भारतात बुद्धाचा जन्म झाला त्याच भारतातून बौद्ध धर्माचा ऱ्हास केला गेला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले पुस्तक Revolution & Counter-Revolution (क्रांती आणि प्रतिक्रांती) या ग्रंथाचा एक भाग म्हणून बाबासाहेबांनी "बौद्ध धर्माचा ऱ्हास व पिछेहाट" या विषयावर लिखाण केले. या निबंधाची टंकलिखीत १८ पाने आहेत. जसे बाबासाहेब म्हणतात भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ क्रांती आणि प्रतिक्रांती, बुद्ध की कार्ल मार्क्स या ग्रंथाशिवाय पुर्ण होत नाही. त्याच प्रकारे क्रांती आणि प्रतिक्रांती हा ग्रंथ बौद्ध धर्माचा ऱ्हास व पिछेहाट या ग्रंथाशिवाय पुर्ण होत नाही असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही.

दुर्मिळ ग्रंथ यांची आज आपल्याला गरज आहे. जे साहित्य वाचकांना गरजेचे आहे आणि ते साहित्य उपलब्ध मिळत नाही. त्यामुळेच नालंदा प्रकाशनाच्या माध्यमातून तळागाळातील लोकांपर्यंत दुर्मिळ साहित्य पोहचविण्याचा हा एक छोटासा संकल्प आहे. वाचकांना या पुस्तकातून बाबासाहेबांचे दुर्मिळ अप्रकाशित पुस्तक उपलब्ध होईल. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात.

राजरत्न ठोसर

बौद्ध धर्माचा ऱ्हास व पिछेहाट

'भारतातून बौद्ध धर्माचे अस्तित्व संपुष्टात आल्याबद्दल या विषयी आस्था असणाऱ्या प्रत्येकास आश्चर्य वाटते व खेद होतो. तथापि हा धर्म अद्यापि चीन, जपान, ब्रम्हदेश, सयाम, अन्नाम, इंडोचायना, श्रीलंका व मलेशियाच्या काही भागात अस्तित्वात आहे. फक्त भारतातच त्याचे अस्तित्व राहिलेले नाही. भारतात केवळ बौद्ध धर्माचे अस्तित्व संपुष्टात आले नसून बुद्धाचे नावही बहुसंख्य हिंदूंच्या स्मरणात राहिलेले नाही. हे घडले कसे? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. परंतु त्या प्रश्नास समाधानकारक उत्तर मात्र नाही. केवळ समाधानकारक उत्तर नाही असे नव्हे तर तसे समाधानकारक उत्तर शोधण्याचाही कोणी प्रयत्न केलेला नाही. या विषयाचा अभ्यास करताना त्यातील महत्वाचा फरक समजावून घेण्यातही लोकांना यश आले नाही. बौद्ध धर्माचा ऱ्हास व बौद्ध धर्माची पिछेहाट यामधील तो फरक आहे. हा असा फरक करणे आवश्यक आहे कारण म्हणजे अनेक असली तरी बौद्ध धर्माची पिछेहाट ही एक गोष्ट आहे. त्या कारणांमुळे त्याचे पतन झाले. या पिछेहाटाची कारणे स्वाभाविक असली तरी त्याच्या ऱ्हासाची कारणे मात्र तितकीच स्वाभाविक नाहीत.

मुस्लिमांच्या अतिक्रमणामुळे भारतातील बौद्ध धर्माची पिछेहाट झाली यात मुळीच शंका नाही. 'बुत'(But) चा शत्रू म्हणून इस्लाम उदयास आला. 'बुत' हा मूळ अरबी भाषेतील शब्द आहे हे प्रत्येकाला माहित आहे. त्याचा अर्थ 'मूर्ती' असा होतो. 'बुत' या शब्दाची व्युत्पत्ती काय आहे हे अनेकांना माहित नाही. 'बुद्ध' या शब्दाचा 'बुत' अरबी अपभ्रंश आहे. अशाप्रकारे मूळ शब्दावरून सूचित होते की, बुद्ध धर्मात मूर्तीपूजा होती हे मुस्लिम मनांनी ओळखले. मुस्लिमांच्या दृष्टीने या गोष्टी म्हणजे सब घोडे बारा टक्के असे होते. त्यामुळे दिसली मूर्ती की फोडून टाक हेच त्याचे कार्य झाले. मुस्लिमांनी फक्त भारतात बौद्ध धर्म नष्ट केला असे नव्हे तर जेथे जेथे ते गेले त्या त्या ठिकाणी त्यांनी हेच केले. इस्लामच्या पूर्वी बॅक्टेरिया, पार्शिया, अफगाणिस्तान, गंधार, चीनी, तुर्कस्थान जवळजवळ संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धर्म पसरला होता. या सर्व राष्ट्रातील बौद्ध धर्म मुस्लिमांनी नष्ट केला. व्हिसेंट स्मिथने याचा उल्लेख करताना म्हटले आहे : ---

"कडव्या धार्मिक हिंदूंनी केलेल्या छळापेक्षाही मुस्लिम आक्रमकांनी अनेक ठिकाणी उद्वेजनक मनुष्य संहार केला आणि त्यामुळेच भारताच्या अनेक राज्यातून बौद्ध धर्माचे नामोनिशानही राहिले नाही."

या स्पष्टीकरणाने सर्वांचे समाधान होईल असे नाही. कदाचित हे स्पष्टीकरण अपूर्ण असेल. मुस्लिम आक्रमकांनी बौद्ध धर्माप्रमाणे ब्राम्हणशाहीवरही हल्ला चढवला. असे असूनही एकाचे अस्तित्व राहिले व दुसऱ्याचे नाही असे का झाले? हा प्रश्नही उपस्थित होऊ शकतो. हा दावा दिखाऊ असला तरी

त्यामुळे या प्रबंधाच्या बळकटीस हानी पोचत नाही. याचा निष्कर्ष एकच की, त्यावेळच्या परिस्थितीत ब्राम्हणशाहीला स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवणे शक्य झाले तर बौद्ध धर्मास ते शक्य झाले नाही. ब्राम्हणशाहीच्या सुदैवाने ती वस्तुस्थिती होती.

जे या विषयाचा अभ्यास करतील त्यांच्या एक गोष्ट लक्षात येईल की, तीन विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीमुळे मुस्लिमांच्या अतिक्रमणाच्या छायेतून ब्राम्हणाशाही स्वत:चे अस्तित्व टिकवू शकली व बौद्ध धर्म स्वत:चे अस्तित्व टिकवू शकला नाही. पहिली गोष्ट म्हणजे मुस्लिमांच्या आक्रमणाच्या वेळी ब्राम्हणशाहीस संस्थानिकांचा पाठिंबा होता. बौद्ध धर्मास तसा पाठिंबा नव्हता. अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिम आक्रमकांचे मूर्तीभंजनाचे कार्य मृतवत होईपर्यंत संस्थानिकांचा ब्राम्हणशाहीस पाठिंबा होता. दुसरी गोष्ट म्हणजे, मुस्लिमांच्या तलवारीने बौद्ध धर्मगुरू प्राणास मुकले त्यामुळे ते जिवंत राहू शकले नाहीत. याउलट ब्राम्हण धर्मगुरूंना नामशेष करणे मुस्लिमांना शक्य झाले नाही. तिसरी गोष्ट म्हणजे भारतातील सत्ताधीश ब्राम्हणांनी बौद्ध मंडळींचा अनन्वित छळ केला. व त्यातून सुटण्यासाठी बौद्धांनी इस्लामाला जवळ केले व बौद्ध धर्माची नव्याने उभारणी केली. वरील तिन्ही प्रकारच्या वस्तुस्थितीस भक्कम पुरावा आहे.

मुस्लिम वर्चस्वाखाली आलेल्या भारतीय राज्यात सिंध प्राताचा पहिला क्रमांक लागतो. तेथे शूद्र राजा सत्तेवर होता. त्याला पदभ्रष्ट करून ब्राम्हणाने तेथे स्वत:ची वंशवेळ निर्माण केली व इ. स. ७२० मध्ये सिंधमध्ये कासीमने आक्रमण केले त्यावेळी समस्त ब्राम्हणांनी स्वाभाविकपणे पाठिंबा दिला. त्यावेळी दाहिर हा ब्राम्हण कुळातील राजा गादीवर होता.

हुएन त्संगने तशी नोंद केली आहे की, पंजाबात त्या काळात क्षत्रिय बौद्ध राज्य करीत होते. बौद्धांची ही राजवट इ. स. ८८० पर्यंत होती. त्यावर्षी ब्राम्हण लष्करी कमांडर लालिया याने क्षत्रिय बौद्धांचा पराभव करून इ. स. १०२१ पर्यंत राज्य केले. शबुक्तगीन व महमद यांनी पंजाबात आक्रमण करण्यापूर्वी तेथे ब्राम्हणशाही होती. आणि जयपाल (इ. स. ९६०-९८०), आनंदपाल (इ. स. ९८०-१०००) व त्रिलोचनपाल (इ. स. १०००-२१) यांचा ब्राम्हणशाहीवर विश्वास होता. मध्य भारतातही महमदाच्या काळापासून मुस्लिमांचे आक्रमण चालू होते व हे आक्रमण शहाबुद्दीन घोरीच्या काळापर्यंत चालू होते. त्यावेळी मध्य भारतात अनेक राजे राज्य करीत होते. मेवाडला (सध्याचे उदयपूर) गुलोहित राज्य करीत होते. संभारला (सध्या त्याचे बुंदी, कोटा व सिरोही असे तीन भाग पडले आहेत) चौहान, ३कनौज येथे प्रतिकार, धर येथे पराचार बुंदेल खंडला चंदेलाल अनहिलवाडला चावदास, चेडी येथे कलचुरीस, राजे राज्य करीत होते. हे सर्व राजे राजपूत होते. आणि हे राजपूत राजे ब्राम्हणांचे कट्टर समर्थक होते.

या आक्रमकाच्या वेळी बंगालमध्ये पूर्व व पश्चिम अशी दोन राज्ये होती. पश्चिम बंगालमध्ये पाल राजे तर पूर्व बंगालमध्ये राजे सेन राज्य करीत असे.

पाल राजे क्षत्रिय होते. ते बौद्ध होते परंतु श्री. वादिय म्हणतात, ४"बहुधा प्रारंभीच्या काळात किंवा नावाने बौद्ध होते." सेन राज्याच्या बाबतीत वेगळी मते आहेत. डॉ. भांडारकर म्हणतात ते ब्राम्हण होते तरही व्यवसायाने क्षत्रिय होते. श्री. वादिय यांच्या मते सेन राजे क्षत्रिय आर्य किंवा लुनारी जातीतील रजपूत होते. काहीही असो, सेन यांच्याप्रमाणे रजपूत हे धर्मनिष्ठ होते.[५]

नेरबुद्ध नदीच्या दक्षिणेस मुस्लिम आक्रमकाच्या वेळी ४ राज्ये होती- १) चालुक्यचे दख्खनचे राज्य २) चोलास चे दक्षिण राज्य ३) पश्चिम किनाऱ्यास कोकणात सिलहारा राजाचे राज्य ४) पूर्व किनाऱ्यावर त्रिकलिंगाचे गंगाराज्य. या सर्व राजवटी इ. स. १०००-१२०० या काळात होत्या व हा काळ मुस्लिमांच्या आक्रमणाचा होता.

या चार राजवटीच्या अधिपत्याखाली काही जहागिरदारांची राज्ये होती. बाराव्या शतकात ही राज्ये प्रबळ बनली व तेराव्या शतकात ही स्वतंत्र व बलशाही झाली. त्यात १) यादवांची राजवट असलेले देवगिरी, २) क्षत्रियांची राजवट असलेले वारांगळ, ३) होयसालस यांची राजवट असलेले हलेबिड, ४) पंड्यांची राजवट असलेले मुद्रा व ५) चेरांची राजवट असलेले त्रावणकोर यांचा समावेश आहे.

या सर्व सत्ताधिशांचा धर्मनिष्ठ ब्राम्हणशाहीवर विश्वास होता, त्याचे अनुयायी होते.

भारतात मुस्लिमांचे आक्रमण इ. स. १००१ मध्ये सुरू झाले. आक्रमकाची शेवटची लाट इ. स. १२९६ मध्ये दक्षिण भारतात पोहचली. त्यावेळी देवगिरीवर अल्लउदीन खिलजीने विजय मिळविला. १२९६ पर्यंत मुस्लिम आक्रमणांनी भारतावर पूर्णपणे विजय मिळविला नव्हता. परंतु, एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे की, या मुस्लिम आक्रमणाच्या ३०० वर्षाच्या काळात भारतात जे राजे होते त्यांचा धर्मनिष्ठ ब्राम्हणशाहीवर विश्वास होता. मुस्लिम आक्रमकांनी ब्राम्हणशाहीचे निर्दालन करण्याचा प्रयत्न केला. तथापि उपजिविकेसाठी त्यांना सत्ताधीशांचे पाठबळ मिळाले. बौद्ध धर्माचेही मुस्लिमांनी उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. परंतु उपजिविकेसाठी त्यांना पाठबळ मिळाले नाही. स्थानिक सत्ताधिशांचा पाठिंबा नसल्याने बौद्धांची मुस्लीम आक्रमकांनी होळी केली.

नालंदा, विक्रमशीला, जगद्दला, ओदंतपुरी येथील बौद्धांची विद्यापिठे मुस्लिम आक्रमकांनी अक्षरश: लुटली. देशाचा आधारस्तंभ असलेले बौद्धांचे मठ त्यांनी जमीनदोस्त केले. त्यामुळे हजारो बौद्ध धर्मगुरू तिबेट, नेपाळ व भारताबाहेरील अन्य ठिकाणी गेले. मुस्लिमांनी अनेकांची कत्तल केली. मुस्लीम इतिहासकारांनीच ज्याची नोंद केली आहे अशा मुस्लिम आक्रमकांच्या तलवारीपुढे बौद्ध धर्मगुरू व त्यांची

धर्मनिष्ठा कशी टिकून राहणार ? बिहारमध्ये इ. स. १२४३ साली मुस्लिमांनी बौद्ध भिक्षूंची कत्तल केली त्याच्या पुराव्याचे सार काढताना श्री. विन्सेट स्मिथ[६] लिहितात :-

"बिहारमध्ये मुस्लिम आक्रमकांनी दहशतवादाने जनतेची लुबाडणूक केली. इ. स. १२४३ साली त्यांनी बिहारच्या राजधानीस वेढा घातला. त्या काळच्या समकालीन इतिहासकारास हल्ला करणाऱ्यांपैकी एक जण सापडला. त्याने सांगितले की, फक्त घोडेस्वारांनी बिहारच्या किल्ल्यास वेढा घातला व पाठीमागील दरवाजातून किल्ल्यात घुसून भरपूर संपती लुटली व तुळतुळीत गोट्याच्या ब्राम्हणांची कत्तल केली. म्हणजेच बौद्ध भिक्षु पूर्णपणे संपलेले होते आणि मठातील ग्रंथालयात मुस्लिमांच्या विजयाची वर्णने असलेली पुस्तके वाचण्यासही कोणी जिवंत राहिला नाही."

अशाप्रकारे मुस्लिम आक्रमकांनी अतिशय निघृणपणे बौद्ध धर्मियांची कत्तल केली. त्याची कऱ्हाड बौद्ध धर्माच्या मुळावर पडली. बौद्ध धर्मातील लोकांची हत्या करून मुस्लिमांनी बौद्ध धर्माचीच हत्या केली. भारतातील बौद्ध धर्माच्या ऱ्हासाला हा दुर्देवी कालखंड कारणीभूत ठरला. अन्य कोणत्याही आदर्शवादाप्रमाणे धर्माचाही प्रसार करावा लागतो. जर हा प्रसार कमी पडला तर धर्माचे अस्तित्वच शिल्लक राहत नाही. धर्मगुरूंचा हा वर्ग कितीही तिरस्करणीय असला तरी धर्म जिवंत राहण्यासाठी त्यांची आवश्यकता असते. कारण त्यांच्यामार्फत धर्मप्रसाराचे कार्य होऊ शकते. धर्मगुरू नसतील तर धर्मही उरणार नाही. मुस्लिम आक्रमकांची तलवार ही धर्मगुरूवरच पडली. त्यामुळे हे धर्मगुरू नामशेष झाले किंवा ते भारताबाहेर निघून गेले. बौद्ध धर्माची ज्योत तेवत ठेवण्यासाठी कोणीही शिल्लक राहिले नाही.

असेही म्हटले जाते की, धर्मनिष्ठ ब्राम्हणाचीही अशीच गत झाली असणार. बौद्ध धर्मगुरूंच्या इतके नसले तरी ते तसे होणे शक्य आहे. परंतु दोन धर्मामध्ये हा महत्वाचा फरक आहे. हा फरक इतका मोठा आहे की त्यातच त्याची कारणे स्टष्ट होतात. मुस्लिम आक्रमणातूनही ब्राम्हणशाही कशी जिवंत राहिली व बौद्ध धर्म कसा जिवंत राहिला नाही हे कळून येते. हा फरक दोन धर्मातील प्रवृत्तीमधील आहे.

धर्मनिष्ठ ब्राम्हण हे संघटित होते. दिवंगत सर रामकृष्ण भांडारकर यांनी आपल्या इंडियन ॲन्टीक्वेटी या ग्रंथात याची सविस्तर कारणमीमांसा देण्यात आलेली आहे.

ते म्हणतात, "प्रत्येक ब्राम्हण कुटुंबात विशिष्ट वेदाचा तसेच वेदाच्या विशिष्ट शाखेचा अभ्यास केला जात असे. या अभ्यासात वेदपठण होत असे. उत्तर भारतात वेदांचे वर्चस्व होते. गुजरातमध्ये वेदांचा काही प्रमाणात अभ्यास होत असे त्यापेक्षा महाराष्ट्रात ते प्रमाण जास्त होते. तेलंगणाभागातही वेदाच्या अभ्यासासाठी अनेक ब्राम्हणांनी आपले आयुष्य खर्च केले. यापैकी अनेकजण दक्षिणेसाठी देशभर भटकले व स्वत:ची उपजिविका करू लागले. मुंबईत मला येऊन जेमतेम एक आठवडा झाला असेल. परंतु एकही तेलंगण ब्राम्हण माझ्याकडे दक्षिणा मागण्यास आला नव्हता.

प्रतेक वेळी माझ्याकडे येणारी व्यक्ती त्यांनी केलेले पाठांतर मला म्हणून दाखवित असे व माझ्याकडील छापील पुस्तकाप्रमाणे बिनचूक पाठांतर आहे की नाही ते पाहत असे.

त्यांच्या व्यवसायावरून सर्वसामान्यपणे प्रत्येक वेदाच्या ब्राम्हणाचे गृहस्थी व भिक्षुक असे दोन प्रकार पडतात. गृहस्थी ब्राम्हण प्रापंचिक सुखासाठी कामधंदा करण्याकडे लक्ष केंद्रीत करीत तर भिक्षुक ब्राम्हण दुर्मिळ पुस्तकांच्या अभ्यासात व धार्मिक विधीच्या पाठांतरात आपले आयुष्य खर्च करतात.

दोन्ही वर्गातील ब्राम्हण दररोज संध्या करतात. संध्येचे प्रकार वेगवेगळ्या वेदाच्या प्रकाराप्रमाणे भिन्न असतात. परंतु गायत्री मंत्राच्या (तत् सवित्र वरेण्यम) प्रथम २ वेळा नंतर २० वेळा किंवा १०८ वेळा पठणाच्या पद्धती सर्वांना एकच आहे.

याखेरीज ब्रम्हयज्ञ हा काही विशिष्ट प्रसंगी सर्वांनाच करावा लागतो.

ऋग्वेदात पहिल्या अध्यायातील पहिल्या स्त्रोतातील पहिल्या वाक्याची सुरूवात अत्रेय ब्राम्हण अशी आहे. या ऋग्वेदात आत्रेय आर्यकांचे ५ भाग, यज्ञ संहिता, साम संहिता, अथर्व संहिता, अश्वालयन कल्प सूत्र, निरूक्ता, खंड, निघंतु, ज्योतिष, शिक्षा, पाणिनी, याज्ञवल्यस्मृती, महाभारत, कानडा व जेमिनी सूत्र व बादरायण यांचा समावेश आहे.

लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे भिक्षुक व गृहस्थी यांच्यात फरक नाही. ब्राम्हणशाहीत दोघेही पुजारी किंवा उपाध्याय, याज्ञिकी करणारे असतात. भिक्षुकास ज्ञानिकीचा अधिकार असतो तितकाच अधिकार गृहस्थीस असतो. जर उपाध्याय म्हणून गृहस्थीची निवड झाली नाही तर त्याचे कारण त्याने मंत्रावर प्रभुत्व मिळविलेले नाही. ब्राम्हणशाहीतील सवलतीमुळे प्रत्येक ब्राम्हण (बहिष्कृत नसल्यास) याज्ञिकीचा, उपाध्याय पद मिळण्यास पात्र ठरतो. सर्व ब्राम्हण मिळून याज्ञिकी करणाऱ्या ब्राम्हणशाहीची पलटण तयार करू शकतात. उपाध्याय म्हणून काम करण्यासाठी विशिष्ठ प्रकारच्या प्रशिक्षणाची किंवा धार्मिक विधीची आवश्यकता नसते. फक्त त्याची उपाध्याय होण्याची इच्छा पुरेशी आहे ती असल्यास ब्राम्हणशाहीत प्रत्येक ब्राम्हण हा उपाध्याय होणे शक्य असते व गरजेनुसार त्याच्याकडून तसे काम करून घेतले जाऊ शकते. त्याच्या जीवनाची प्रगती कोणीही रोखू शकत नाही.

बौद्ध धर्मात हे शक्य नाही. धर्मगुरूपदी आरूढ झालेल्या धर्मगुरूंकडून ठरावीक पद्धतीने दिक्षा घेतल्यावर ती व्यक्ती धर्मगुरू होऊ शकते. बौद्ध धर्म गुरूंच्या सामुहिक हत्येनंतर धर्मगुरूंची नियुक्ती करणे अशक्य झाले. परिणामी धर्मगुरूंचे अस्तित्व जवळजवळ संपले. ही पोकळी भरून काढण्यासाठी दुय्यम दर्जाचे बौद्ध धर्मगुरु तयार करण्याचे काही प्रयत्न झाले. सर्व उपलब्ध मार्गांनी नवीन धर्मगुरूंच्या नेमणुका केल्या गेल्या. ते निश्चितपणे उत्तम दर्जाचे नव्हते. हरप्रसाद शास्त्री लिहितात,

“ भिक्षूंच्या नियुक्तीमुळे बौद्ध उपासकांच्या रचनेत बरेच मोठे बदल झाले. कुटूंबवत्सल विवाहीत उपासक होते त्यांना आर्या म्हटले जात असे. त्यांनी भिक्षुंची योग्य जागा घेतली. त्यांनी बौद्ध धर्मीयांच्या धार्मिक गरजांची पूर्तता केली. काही संस्कार करून पुर्वीच्या भिक्षुंचा दर्जा मिळविला. धार्मिक विधी करण्याचे ते काम करू लागले व त्याचबरोबर आपला नेहमीचा व्यवसायही पाहू लागले. (उदा. या व्यवसायात सुतारकाम, सोनार, रंगकाम इ.) या कारागीर भिक्षुंच्या संख्या योग्य भिक्षुंपेक्षा जास्त झाली व तेच लोकांना धार्मिक मार्गदर्शन करू लागले. त्यांच्या व्यवसायामुळे त्यांना ज्ञानप्राप्तीसाठी, सखोल चिंतनासाठी, ध्यानधारणेसाठी कमी वेळ मिळू लागला. त्यामुळे बौद्ध धर्माची पिछेहाट ते थांबवू शकतील अशी अपेक्षा करणे शक्य नव्हते. किंवा धर्माचा दर्जा उंचावू शकत नव्हते.

हे स्वाभाविक आहे की हे नवे बौद्ध भिक्षु यांना दर्जा प्राप्त झालेला नव्हता किंवा ज्ञानही प्राप्त नव्हते. परिणामी ते ब्राम्हणाच्या तुलनेत कमी पडले. ब्राम्हणांचा कावेबाजपणा हा त्यांच्या ज्ञानाइतकाच समसमान होता.

फिनिक्स पक्षांप्रमाणे राखेतून ब्राम्हणशाही कमी उभी राहिली व बौद्ध धर्म का उभा राहू शकला नाही याचे कारण जाणून घेतले पाहिजे. त्याचा जमाखर्च डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. बौद्धधर्मावर ब्राम्हणशाहीच्या परंपरात वर्चस्वामुळे हे घडलेले नाही. याचे कारण ब्राम्हणाच्या उपाध्याय होण्याच्या पद्धतीत दिसून येते. बौद्ध धर्म संपला कारण त्याची भिक्षुची पलटण संपली होती व ती पलटण पुन्हा उभी करणे शक्य नव्हती. जरी मार खाल्ला तरी पुर्णपणे संपले नव्हते. प्रत्येक जिवंत असलेला ब्राम्हण हा उपाध्यय होऊ शकत नव्हता. याज्ञिकी करू शकत होता व प्रत्येक मृत झालेला उपाध्यायाची तो जागा भरून काढत होता.

बौद्ध धर्मीय लोकसंख्येचे मुस्लीम धर्मात धर्मांतर झाल्यामुळे बौद्ध धर्माची पिछेहाट झाली. त्याबाबत क्वचितच शंका येऊ शकेल.

अलाहाबाद येथे १९३८ साली झालेल्या राजपुत जमातीच्या भारतीय इतिहास मेळाव्यात अध्यक्ष पदावरून बोलताना प्रा. सुरेंद्रनाथ सेन यानी भारताच्या मध्ययुगीन इतिहासासंदर्भात दोन प्रश्नांवर नेमके बोट ठेवले. त्याला अद्यापही समाधानकारक उत्तर मिळू शकलेले नाही. त्यानी दोन गोष्टींचा उल्लेख केला. त्यापैकी एक मूळ राजपुताच्या संदर्भात होता व दुसरा प्रश्न भारतीय मुस्लीम लोकसंख्येची विभागणी. दुसऱ्या प्रश्नाचा उल्लेख करून ते म्हणतात,

“ परंतु मला फक्त एकाच प्रश्नावर बोलण्याची परवानगी असावी की जो प्रश्न इतिहास जमा झालेला नाही. भारतीय मुस्लीम लोकसंख्येच्या विभागणीमागे काहीतरी स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. सर्वसामान्यपणे असे म्हटले जाते की इस्लामच्या अनुयायांनी लोकांचा छळ करून त्यांना मुस्लीम धर्मावर श्रद्धा ठेवण्यास भाग पाडले जात होते. पंजाब व वायव्य सीमा भागातील मुस्लीमांचे वर्चस्व यावर या विधानास पुष्टी मिळते. परंतु हेच तत्व पुर्वी बंगालमधील बहुसंख्यांक मुस्लीमांना लागू पडत नाही. कुशनच्या काळात वायव्य भागातील तुर्की जमातीचे लोक बहुसंख्य होते. त्यामुळे त्यांचे मुस्लीम धर्मात

धर्मांतर करणे सोपे होते. परंतु पुर्वीकडे बंगालमधील मुस्लीम हे मुळचे तुर्कस्थान किंवा अफगाणिस्थानचे नव्हते. त्यामुळे त्या भागातील हिंदूंच्या धर्मांतरास वेगळे कारण असले पाहिजे.

दुसरे वेगळे कारण काय असावे ? मुस्लीम बखरीत ही कारणे प्रा. सेन यांना सापडली व त्यानी ती मांडली. नमुन्यादाखल सिंध प्रांताचे उदाहरण घेऊन ते म्हणतात. "सिंध प्रांतातील बौद्धांना सत्ताधारी ब्राम्हणांनी अवमानीत केले. त्यांना अपमानस्पद वागणूक दिली. त्यामुळे जेव्हा भारतात अरब आक्रमकांनी प्रवेश केला. त्यामुळे बौद्धांनी त्यांचे मन:पुर्वक स्वागत केले. त्यानंतर दाहिर राजाची हत्या झाली व मुस्लीम सत्ताधिशांनी या देशात स्वत:चे आसन बळकट केले. आणि बौद्धांना त्यांच्या हक्काबाबत चिंता वाटू लागली. याउलट हिंदूंना प्राधान्य क्रमाने वागणूक मिळू लागली. या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी व हक्क सुरक्षित राहावेत यासाठी मुस्लीम धर्माचा स्वीकार करण्याखेरीज बौद्धांपुढे दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे सिंधमधील बौद्धांनी मोठ्या संख्येत मुस्लीम धर्मात प्रवेश केला. प्रा. सेन पुढे म्हणतात,

मुस्लीम राजवटीपुर्वी बौद्धांचे बालेकिल्ले असलेले काश्मीर, पंजाब तसेच बिहार शरीफ, इशान्य बंगाल, भोवतालच्या जिल्ह्यात मुस्लीमांचे वर्चस्व आले आहे हा काही अपघात असू शकत नाही. हिंदुपेक्षा राजकीय महत्वकांक्षेस बळी पडून बौद्धांनी भावी उत्कर्षासाठी व राजकीय स्थैर्यासाठी सहजपणे धर्मांतर केले असा निष्कर्ष योग्य ठरणार नाही.

दुर्दैवाने भारतीय बौद्धांना इस्लाम धर्म स्विकारणे का भाग पडले याचे कारणे अद्याप सापडली नाहीत. त्यामुळे धर्मांतरास ब्राम्हणशाही कितपत जबाबदार आहे हे सांगता येत नाही. परंतु त्यामागे एक प्रमुख कारण आहे हे सांगण्याची गरज नाही. दोन राजाच्या राजवटीत बौद्धांचा अनन्वीत छळ झाला याचा आमच्याकडे पुरावा आहे.

पहिला उल्लेख मिहिरकुल राजाचा करावा लागेल. तो हुन्स जमातीचा होता. इ. स. ४५५ मध्ये त्याने भारतात आक्रमण केले व उत्तर भारतातील सकल येथे (सध्याचे पंजाबमधील सियालकोट) आपले राज्य स्थापन केले. त्याने इ. स. ५२८ पर्यंत राज्य केले. विन्सेट स्मिथ म्हणतात,

सर्व भारतीय दंतकथात मिहिरकुलीची राजवट म्हणजे रक्त पिपासू जुलमी राजवट असे वर्णन केले आहे. तो निर्दयापेक्षाही महानिर्दय उलट्या काळजाचा होता.

स्मिथ यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, शांत स्वभावाच्या बौद्धांवर मिहिरकुलने अनन्वीत अत्याचार केले. त्यांचे मठ निदर्यपणे उध्वस्त करून टाकले व स्वत:चा खजिना भरला.

दुसरा उल्लेख पुर्व भारताचा राजा सांसंकचा करावा लागेल. सातव्या शतकाच्या पहिल्या शतकात त्याने राज्य केले. हर्षबरोबर झालेल्या लढाईत त्याचा पराभव झाला. विन्सेट स्मिथ लिहितात,

सांसक राजाला हर्षच्या भावना कातील म्हणून ओळखले जाते व बहुधा गुप्त घराण्याचा वंशज म्हणून तो शिवभक्त होता. तसेच बौद्ध धर्माचा तिरस्कार करणारा होता. त्याने ते कृतीने सिद्ध करून दाखविले. बुद्धगया येथील पवित्र बौद्धवृक्ष त्याने उकरून काढून जाळून टाकला. (दंतकथेनुसार त्या

वृक्षावर राजा अशोकाचे अर्माद प्रेम होते व पाटिलीपुत्र येथे त्याने बुद्धाच्या दगडी पादुकाचे स्मारक केले होते.) मठ उध्वस्त केले. त्यामुळे विखुरलेले भिक्षु नेपाळमध्ये गेले.

सातवे शतक हे भारतीय धर्मावर अत्याचाराचे शतक असे म्हणावे लागेल. स्मिथ पुढे म्हणतो,

सातव्या शतकात जैन धर्मावर दक्षिण भारतात अशाच प्रकारे पाशवी अत्याचार झाले.

मुस्लीम आक्रमकाच्या काळाजवळ जाताना सिंध प्रांतातील आपल्यापुढे उदाहरण आहे की ज्या प्रांतात अतिशय अत्याचार झाले. व हे अत्याचार मुस्लीमांचे आक्रमण होईपर्यंत बौद्धधर्माच्या विरोधात असणाऱ्या उत्तरेतील ब्राम्हण व राजपुत राजांनी चालूच ठेवले होते. बाराव्या शतकात जैन समाजाचाही भरपूर छळ झाला. त्यास इतिहासाचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. इ. स. ११७४ - ६ च्या काळात गुजरलामध्ये गादीवर आले. त्या अजयदेव या शैव राजाने निर्दयपणे जैन समाजावर अत्याचार केले. त्याचा स्मिथ यांनी उल्लेख केला आहे.... अजयदेवने जैनाच्या अनेक नेत्यांना हालहाल करून ठार मारले असे सांगून स्मिथ म्हणतात की, जैनांवरील अत्याचाराचे अनेक उदाहरणे पुराव्यासह देता येईल.

थोडक्यात ब्राम्हणशाहीच्या छळवादातून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी बौद्धांनी इस्लाम धर्माचा स्विकार केल्याने बौद्ध धर्माची पिछेहाट झाली असा निष्कर्ष काढण्यात चूक नाही. जर पुरावा या निष्कर्षास पुरक ठरणार नसेल तर किमान संभवनीय ठरू शकेल. ही जर दुर्दैवी घटना असेल तर दुर्दैवास कारणीभूत असलेल्या ब्राम्हणशाहीचे आभारच मानले पाहिजे.

संदर्भ टीपा :

[१] : पहा बुद्धिझम इन प्री. ख्रिश्चन ब्रिटन १ लेखक - डोनाल्ड मॅकेझी

[२] : अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया (१९२४)

[३] : कनौजचे अस्तित्व राहिले नाही. पृथ्वीराजाने तीव्र प्रतिकार करूनही मुस्लिम आक्रमकांनी ते नष्ट केले.

[४]: हिस्टरी ऑफ मेडिकल हिंदू खंड २ पृ. १४२

[५]: हिस्टरी ऑफ मेडिकल हिंदू खंड इबिद खंड २ प्रकरण १०.

[६]: अर्ली हिस्टरी ऑफ इंडिया (१९२४) पृष्ठ ४१९-४२०.